# शके १८४८ चे पुण्यतिथीचे उत्पन्नाचा हिशेब.

## जमा

| | |
|---|---|
| ९५६।=। | वर्गणी भक्तांकडून खालीं दिलेल्या यादीप्रमाणें. |
| ६ | व्याज रा. रा. निळकंठराव सहस्त्रबुद्धे यांनीं दिलेल्या नोटीचें |
| ९०४=। | श्रीचे समाधी पुढील पेटींत पांच दिवसांत दक्षिणा आली ती |
| १०५२॥०॥ | |

## नांवें

| | |
|---|---|
| ३७८॥- | भोजनखर्च. |
| ३९॥०॥। | पोस्टेज. |
| १० | बँड. |
| १ | घोड्यास ओंवाळणी. |
| ५१॥। | आचाऱ्यांचा पगार, रेलवे खर्च व पक्वान्न करण्याची मजुरी वगैरे. |
| १३।≋ | रोषनाई. |
| ६। | भोजनदक्षिणा. |
| ५।-॥ | आराधनविधि दक्षिणा. |
| ११ | जपानी कागदी डेकोरेशन. |
| -॥= | रंगाच्या वड्या. |
| १६। | गलेफ. |
| | ८।॥ साटीन. |
| | ७॥ फीत. |
| | १६। |
| ५४= | श्रीराममारुतीचे पुण्यतिथी प्रीत्यर्थ मनीआर्डर चार्जसह. |
| १२ | निमंत्रणकार्ड छपाई. |
| ६।= | श्री. गजाबाईचा शेरा पेढे, फळफळावळ, हार वगैरे. |
| ११- | गजानन महादेव, विठ्ठल पंड- |

| | |
|---|---|
| | पुंडलीक व आनंदराव परशराम डोळ्स अभिषेक. |
| १० | एच. सी. कूपर यांचेसाठी झालेला खर्च. उदवत्ती, कापूर, शेरा,खडीसाखर, पेढे व खैरात. |
| -॥।-১ | श्री बहिरोबा तेल, शेंदूर. |
| ५ | अनाथ विद्यार्थी. |
| ५ | शेरा. |
| २० | हरिदास. |
| | १५ मारुतीबुवा. |
| | ५ सोपाना. |
| | २० |
| १९ | खैरात. |
| २ | गवतचारा. |
| २៩= | प्रसाद पाठविण्यास पिशव्या. |
| ६२२॥०॥ | |
| ४३० | शिल्लक. |
| १०५२॥०॥ | |

## शके १८४८ सालच्या श्री शिरडी येथील पुण्यतिथीचे उत्सवास आलेल्या मदतीची पोंचः—

| | |
|---|---|
| ५० | सौ. चंद्राबाई बोरकर |
| २१ | शेट गोवर्धन गिरधर |
| २१ | रा. रा. केशव नारायण शृंगारपुरे |
| २० | ,, ,, डी. राजा देसाई |
| २० | ,, ,, म. ग. गोठुसकर |
| २० | सौ. लक्ष्मीबाई ना. गोरक्षकर |
| १८॥= | रा. रा. जी. के. गाडगीळ |
| १५॥= | ह. भ. प. उद्धवेश बुवा |
| १५ | सरदार माधव व्ही. किबे. |
| १५ | सौ. खाशीबाई |
| १५ | रा. रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत |
| १५ | ,, केशव गणेश आजरेकर |
| ११ | ,, रामकृष्णा श्रीकृष्णा नवलकर |
| १० | ,, संतराम धोंडिबा सुगंधी |
| १० | रा. रा. गणेश हरि वाटवे. |
| १० | ,, ,, व्ही. डब्ल्यु. रेळे. |
| १० | ,, ,, रामभाऊ तांबे |
| १० | ,, ,, व्यंकट लिंबाजी कोडळ. |
| १० | ,, ,, त्रिंबक गोविंद पाटील |
| १० | ,, ,, केशव सांवळाराम कुळकर्णी |

१० रा. रा. बापुभैय्या कोठारी
१० डॉ. रंगनाथ नारायण गऱ्हाणकर
१० शेठ एच. सी. कूपर
१० रा. रा. कृष्णाजी वि. तालचेरकर
१० श्रीमति गजाबाई नांदोडकर
१० रा. रा. डी. एस. ओक
१० ,, ,, मुकुंद जनार्दन दांडेकर
१० ,, ,, रघुनाथ वासुदेव हंबीर
१० ,, ,, गोविंद रघुनाथ दाभोळकर
१० डॉ. केसरीनाथ व्ही. सावे.
९ रा. रा. त्रिंबक आनंदराव कर्णिक
७ ,, एस्. बी. कंटक
६ ,, त्रिंबक बळवंत चित्रे.
६ ,, पांडुरंग टी. कोपीकर
५। ,, गंबा अप्पा शेट
५ ,, रघुनाथ हरि वाटवे
५ श्रीमति पार्वतीबाई भास्कर रांगणेकर
५ रा. रा. यशवंत जगन्नाथ पंडीत
५ ,, गोविंद हरी देशमुख
५ ,, श्रीकृष्ण गोपीनाथ दिघे
५ ,, जी. के. रेगे
५ ,, श्रीनिवास हरि हळदणकर
५ ,, विनायक यशवंत प्रधान
५ ,, रामकृष्ण नाना बगल

| | |
|---|---|
| ५ | श्रीमति सुशीलाबाई शंकरराव प्रधान |
| ५ | रा. रा. गजानन महादेव वायंगणकर |
| ५ | एका दत्तभक्ताकडून |
| ५ | रा. रा. गजानन एम. गरुडे |
| ५ | रा. रा. रघुनाथ अर्जुन वेंगुर्लेकर |
| ५ | श्रीमति जानकीबाई सीताराम घटे. |
| ५ | रा. रा. गोविंद नारायण सामंत |
| ५ | " सत्यवान रामचंद्र मयेकर |
| ५ | श्रीमति शांताबाई ब्रह्मांडकर |
| ५ | ,, सुलोचनाबाई वाकडे |
| ५ | रा. रा. चिंतामण रामनाथ सातघरे |
| ५ | ,, दाजी विठ्ठल सांबारे |
| ५ | ,, महादेव सीताराम आजगांवकर |
| ५ | ,, जी. एस. कोठारी |
| ५ | सरदार श्रीनिवास सी. मुदलीआर |
| ५ | रा. रा. आत्माराम केशव कुळकर्णी |
| ५ | रावसाहेब विनायक गणेश देशपांडे |
| ५ | रा. रा. मोरेश्वर सखाराम कोपराडकर |
| ५ | ,, त्रिभुवन नरोत्तम अढीया. |
| ५ | ,, लक्ष्मणराव रेडे |
| ५ | ,, चिंतामण नारायण वेलणकर |
| ५ | ,, महादेव हरी कर्णिक |
| ५ | " बी. एस्. फणसे |

५ रा. रा. मनोहर बाळाराम मानकर

५ " गोविंद नारायण दाभोळकर

" द्वारकानाथ हरि देशमुख

५ " पु. र. अवस्ती

५ " डी. एम. रत्नपारखी

५ श्रीमति गोदावरीबाई लव्हेकर

५ " रमाबाई कामत

५ रा. रा. कमळाकांत बाळाराम मानकर

५ श्रीमति राधाबाई राजाध्यक्ष

५ रा. रा. पांडुरंग रामचंद्र

५ श्रीमति मंजुळाबाई आर. रेडकर

५ रा. रा. एम. टी. महागांवकर

५ " आनंदराव सुंदरजी धराधर

५ " रामराव हुंडेकरी

५ " लक्ष्मण गोविंद मुंगी

५ " वामन सांबा केसरकर

५ श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर

५ रा. रा. द्वारकानाथ आर. चौबळ

५ डॉ. डी. एन. गुणे

५ रा. रा. दिनकर मोरेश्वरराव पाटकर

५ श्रीराम मारुती संस्थान कल्याण

५ रा. रा. पांडुरंग जयराम मंत्री

५ " सावळेराम नामदेव रासने.

५ रा. रा. गोविंद अनंत नाडकर्णी
५ " रामभाऊ मोडक
५ " माधवराव देशपांडे
४ " बी. व्ही. देव.
४ " शंकर परशराम सामंत
४ " आत्माराम बाबाजी पेंडुरकर
४ श्रीमति लक्ष्मीबाई बोरकर
४।- खैराती साठीं जमा

२ रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे
१ " पु. र. अवस्ती
१ " विनायक यशवंत प्रधान
।- " विठ्ठल पुंडलीक रांगणेकर

४।-

३॥ रा. रा. विनायक अप्पाजी वैद्य.
३८= " गोविंद नारायण गुप्ते
३ डॅ. हाटे
३ रा. रा. वामन गोविंद कानिटकर
३ " म्यानेजर लेवा सत्पंथी मोफत वाचनालय
३ " बळवंत हरी कर्णिक
३ " बाळकृष्ण भिकाजी परब
३ " विष्णु सदाशिव बक्षी
३ " गणपत विश्राम देसाई
३ " गोपाळ हरि कोठावळे

| | |
|---|---|
| ३ | रा. रा. शांताराम लाडकोबा तोरसकर |
| ३ | ” रावजी बाळकृष्ण उपासनी |
| ३ | ” खंडेराव माधवराव विजयकर |
| ३ | ” सदाशीव हरि माणगांवकर |
| २॥ | ” मोरेश्वर माधवराव दहीसकर |
| २॥ | रावसाहेब धोंडु विष्णु परुळकर |
| २॥ | रा. रा. आनंदराव परशराम डोळस |
| २॥ | ” बाळाराम आत्माराम शिरोडकर |
| २॥ | ” धोंडु महादेव अनावकर |
| २॥ | ” ठाकरसी भाईदास |
| २ | रा. रा. विष्णु बळवंत पितळे |
| २ | ” बाबाजी आनंदराव मोहीले |
| २ | ” गणेश बाळकृष्ण गाडगीळ |
| २ | ” बसाप्पा सातलिंगाप्पा |
| २ | ” शिवलाल बन्सिलाल |
| २ | ” यशवंत जनार्दन गाळवणकर |
| २ | ” यशवंत गणपतराव देसाई |
| २ | ” जनार्दन रामचंद्र दळवी |
| २ | ” एन. बी. राणे |
| २ | ” रावजी विनायक शृंगारपुरे |
| २ | ” भास्कर नारायण पाठणकर |
| २ | ” राजाराम केशव वालावलकर |
| २ | कै. वा. गणेश बळवंत वागळे |

२ रा. रा. एस. जी. परूळकर
२ " डी. आर. खवणेकर
२ डॉ. व्यंकटेश दत्ताराम नाडकर्णी
२ रा. रा. वासुदेव रामचंद्र घोलप
२ रा. रा. गणेश पांडुरंग बेंद्रे
२ सौ. चंपूबाई रामकृष्ण चोणकर
२ रा. रा. एस. के. चव्हाण
२ " बाळकृष्ण रामचंद्र
२ " लक्ष्मण नारायण पारकर
२ " विनायक गणेश गडकरी.
२ सौ. बनुबाई करंजेकर
२ रा. रा. जनार्दन बाजी गाळवणकर
२ " दिनकर जगन्नाथ गाळवणकर
२ " विष्णु बाळकृष्ण परांजपे
२ " यशवंत राजाराम जुन्नरकर
२ " के. ए. बेंद्रे
१।।= श्रीमती यश्वदाबाई नारायण नाईक
१। रा. रा. कृष्णाजी रामचंद्र खंडकर
१। " आनंदराव वामनराव व्यवहारकर
१। " वामनराव जनार्दन व्यवहारकर
१। रा. रा. गणेश भास्कर कराडकर
१। " यादव विठ्ठल म्हात्रे
१। " सदाशीव गणेश परांजपे

| | |
|---|---|
| १। | रा. रा. हरी गोपाळ सकपाळ |
| १। | काजी मिया अबदुल रहिमान |
| १। | " सीताराम अप्पाजी नाईक |
| १। | " भीमजी भानजीशेट गुजर |
| १। | धोंडी चिमाजी कुडाळकर |
| १। | " अनंत यशवंत वाघ |
| १। | " दत्तात्रय अनंत वाघ |
| १। | " नंदकुमार अनंत वाघ |
| १। | " रावजी महादु कुडव |
| १। | सौ. भीमाबाई अण्णा सामंत |
| १। | रा. रा. मुकुंदराव महादेव मोहिले |
| १। | श्रीमति चंपूबाई आनंदराव धराधर |
| १। | श्रीमति रोजाबाई बाळाराम मानकर |
| १। | रा. रा. मनमोहन रघुनाथ जयकर |
| १। | " रामराव दीनानाथ मदन |
| १। | शेठ नादीरशाह मेरवानजी कमीसरीयटवाला |
| १। | श्रीमती पार्वतीबाई शिवराम पाठारे |
| १। | रा. रा. एम्. जी. कोरान्ने |
| १। | " लाडु नारायण तेंडले |
| १। | " शंकर सदाशिव ताठरे |
| १। | " गोपाळ रघुनाथ राजे |
| १। | " शिवराम गणेश गुप्ते |
| १८८। | " नारायण गोविंद काजळे |

१ रा. रा. शंकर मुकुंद देवस्थळे
१ " दुर्गाराम दत्ताराम
१ " शंकर रा. कानजी
१ सौ. कृष्णाबाई राजाराम वालावलकर
१ रा. रा. निळकंठ विनायक वैद्य
१ " रामगणेश टिपणीस
१ " एस. पी. किनरे
१ " डी. डब्ल्यू. वैद्य
१ सौ. चौबळ
१ रा. रा. आनंदराव मंगेश कावाडी
१ " लक्ष्मणराव वाळिंबे
१ " कृष्णाजी दाजीशेट मोहरे
१ सौ. आवडाबाई सामंत
१ रा. रा. सदाशिव विश्वनाथ देव
१ " सदानन्द विनायक तळपदे
१ " गणपतराव मोरेश्वर कोठारे
१ श्रीमति चंपूबाई गणपतराव कोठारे
१ रा. रा. शिवराम नारायण दीक्षित
१ " दत्तात्रय महादेव चौबळ
१ रा. रा. सदाशीव गणेश वळंजू
१ सौ. पार्वतीबाई शंकरराव गव्हाणकर
१ सौ. यमुनाबाई रंगनाथ गव्हाणकर
१ रा. रा. सखाराम विष्णु वेलणकर

| | | |
|---|---|---|
| १ | रा. रा. | अनंत राजाराम बालावलकर |
| १ | ” | भालचंद्र राजाराम बालावलकर |
| १ | ” | गजानन राजाराम बालावलकर |
| १ | ” | श्रीपाददर्श चिटणीस |
| १ | ” | शंकर सीताराम ठाकूर |
| १ | श्रीमती | पार्वतीबाई ओझरकर |
| १ | रा. रा. | के. एल. बावचकर |
| १ | ” | काळूराम नारायण |
| १ | ” | रामजी घारु |
| १ | ” | जगन्नाथ बाबाजी बैती. |

एकूण रु. ९५६।=।

॥ ॐ श्रीगुरु साईश प्रसन्न ॥

# भाग्यशाली संक्रांत.

लेखक:- भवदीय—श्रीउद्धवेश ऊर्फ श्रीसाईसुत शामदास.

॥ आर्या ॥

श्रीसाइनाथ चरणीं, अल्पहि करणीं करीतसें हजर ॥
सर्वत्र दोष त्यागुनि, बुधजनिं धावीच इजकडे नजर ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ ( शार्दूलविक्रीडीत् )

घेवोनी तिळगूळ गोड वदणें, हें बोल चोहींकडे ।
सारें प्रेमळ होति संचिति जणूं हें वाक्सुधेचें सडें ।
गेले दुष्ट विकार पार सगळे, वाटे लयाला क्षणीं ।
वाटे प्रेम जळापगा सुविमला ही ऐक्य संवर्धिनी ॥१॥

श्रीमत् परमदयाळु भक्तकामकल्पद्रुम, योगिराज, श्रीसाईबाबा स्वामींचे पूज्य चरणकमलाचें दर्शनास एका वेळेस त्यांचेच प्रेरणेनें महासण मकरसंक्रांतीच्या आधीं दोन दिवस श्रीक्षेत्र शिलधी ( शिर्डी ) स आलों होतों. त्यांना जेव्हां जेव्हां आपल्या लेकरांना आपल्यापाशीं आणावयाचें असतें, तेव्हां तेव्हां त्या व्यक्तीकडून कांहीं तरी महत्वाचीं कार्यें (अगर कल्याण होण्यासाठींच) करून घेण्यासाठींच आणीत असत व असतात अशी माझी दृढ समजूत आहे. कारण—श्रीसाई—सर्वत्र व्यापक होते व आहेत. ही ठेव ज्याच्या त्याच्या पूर्वसंचितक्रियमाणाप्रमाणें ती त्या त्या व्यक्तीस मिळते; पण प्रत्यक्ष सान्निध्यांत बोलावण्यांत त्यांचे कांहींतरी उद्दिष्ट हेतु असतातच. व तें सकृत् दर्शनीं आम्हां अज्ञ कीटकांना कळणें त्यांचे कृपेशिवाय अशक्यच होय.

त्यासालीं प्रियबंधू—कैलासवासी श्रीकाकासाहेब दीक्षित व कैलासवासी सौ.मा. काकीसाहेब आदि मंडळी श्रींचे चरणसेवेंत होती. आलों त्या दिवशीं विशेष कांहीं बोलणें वगैरे, दक्षिणा वगैरे श्रींनीं मागितली नाहीं. संध्याकाळी चार साडेचारचा सुमार असेल. काकासाहेबांचे वाड्यांत बिऱ्हाड ठेवून श्रीं मशिदीकडे श्रींच्या धुळदर्शनास गेलों. बरीच अपरिचित, व परीचित मंडळी

**श्रींचे** चरणसान्निध्यांत व सभोंवार बसलेली होतीच. **श्री**–कांहींसें बोलत होते, व चिलीम एका हातांत होतीच. **श्रीचरणीं** भाल ठेविलें. **श्री** कोमल-करानें पूर्णपणें माझें मस्तक हालवून म्हणाले, उठ बैस 'तिकडे ( निंबराचे व जात्याच्या नजिकच्या खांबाकडेस हातानें दाखविलें. ) तेथें बसलों. त्यावर **श्रींनें** म्हटलें, " कितीजणें आलांत, किती दिवस राहाणार ? " मी म्हटलें " जशी मालकांची आज्ञा " इतकें म्हणून स्वस्थ बसलों. बऱ्याच मंडळींचें येणें जाणें, व त्यांचीं अनंत प्रकारचीं गाऱ्हाणीं आपआपल्या परीनें जो तो **श्रींस** निविदित होता. ते दिवस शाळु असल्यानें श्रीसवितानारायण अस्ता-चलास झटझट जातच होता. **श्रींची** संध्याकाळची फेरीची वेळ आली. सर्वं-त्रांसीं **श्रींनीं** उदी घेण्यास सांगितलें त्या त्या प्रमाणें ज्यांनीं त्यांनीं **श्रीकरां-तील** प्रसादी उदी घेतली. **श्रीही** उठले. त्यावेळचा तो भक्तसमुदायाचा देखावा व **श्रींची**-नयनमनोहर गौरवर्ण मूर्ति, व त्यांचें प्रत्येक फेरीचे वेळचीं निघणारीं वाक्सुधा, व त्यांचें सकाळचे दोन प्रहरचे, व संध्याकाळचे फेरी कर-ण्याचे उद्देश काय ? आदिविचार व त्यापासून आम्हां मानवांनीं काय बोध ध्यावयाचा, व ते काय म्हणून ह्या तीन फेऱ्या ( त्रिकाळ ) करीत असत. याची मी माझी जी अल्प समजूत झाली आहे, ती केंव्हां तरी लिहीन. फेरी वगैरे झाली. उत्कट गुरुभक्तीचा ठेवा ज्या प्रिय कै. काकासाहेबांना मिळाला ते व मी आणखी दोन तीन मंडळीसह वाडयांत आलों. चहा वगैरे घेणें झाल्यावर आम्हीं उभयतां **श्रीमल्हारीमार्तंड प्रभूचें** देवळावरून फिरण्यास गेलों. ( त्यावेळेस श्रीमार्तंड प्रभूचें श्रीखंडेरावाचें–देऊळ चांगल्या स्थितींत होतें. हल्लीं तें जीर्ण झालें असून वरील घुमट पडलेलें आहे. त्या मंदिराकडे समस्त शिर्डीवासी गुरुबंधूंनीं लक्ष देऊन तें पूर्व स्थितीवर आणावयाची प्रेरणा **श्रीसाईगुरुराजानें** करावी अशी त्यांच्या चरणकमलीं विज्ञप्ती आहे. ) वाटेनें **श्रींच्याच** लीलादिकौतुकाच्या गोष्टी होत होत्या. श्री. कै. **काकासाहेबांची** **श्रीचरणीं** अढळनिष्ठा व गुरुप्रेमभक्ति कशी होती, तर त्यांच्या निधनानंतर वरहाच्या आर्यासप्तकांपैकीं एक आर्या उद्धृत करीत आहें ती अशी

॥ आर्या ॥

**ई-शैंद्वय रूपा तें धरुनी गुरुशिष्य प्रेम दावियलें ॥**
**न कळे मार्ग जयांना, प्रेमें भक्तीपथासि लावियलें ॥ १ ॥**

आर्येप्रमाणें ते देही असतां ती होती. तथापिही त्यांचें गुरुभक्ति प्रेमाचें चित्र रेखाटणें मजसारख्या अल्पबुद्धीच्या प्राण्यास निदान अशक्य होय.— जसें "साखरेची गोडी कशी" असा सवाल जर कोणीं कोणास केला तर त्याचें उत्तर—"खाऊन पहा म्हणजे कळेल." "निष्ठावंत भाव। भक्ताचा स्वधर्म" ही साधुउक्ति देहपात झाल्यानंतरही श्रीसद्गुरु सेवेसी ज्यांची चित्‌शक्ति विसरत देखील नाहीं. यापासून प्रत्येक सजीव गुरु--कन्यापुत्रांनी पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे असें मला वाटतें. व इतकी जेव्हां श्री सद्गुरुसेवेंत तल्लीनता होईल व अशी कृपा श्रीमालिकांची होईल तो (अर्थाचरण) तो प्राणी सत्यसाच हो तरला हेंच खरें. फिरून आल्यावर फराळ वगैरे आटोपला. कै० काकासाहेबांचा नेम असा असे कीं, पुन्हां रात्रीं श्रीकडे मशिदींत जावयाचें व त्या दिवशीं **श्रीमालिकांचा** शयनाचावार मशिदींतच होता. सुमारें रात्रीं ८॥--९ वाजले असतील मी व काकासाहेब व दुसरे तीन चार इसम यांसह श्री मशिदींमाईंत गेलों. तों **श्रीचें** नुकतेंच खाणें वगैरे झालें असून जवळ कै० वयोवृद्ध, सात्विक, श्रीभक्तराज ह्माळसापती बाबा व एकदोन अनोळखी माणसें होतीं. कै. **ह्माळसापती बाबा** यांची **श्रीचरणीं** अढळ निष्ठा कशीं, त्यांची सेवा कशी, व त्यांची व श्रींचीं आदिमैत्री कशी होती ? तर आठवा अवतार जो श्रीयदुराज श्रीकृष्णचंद्रप्रभु व परमसात्विक भक्तवर्य श्री उद्धव यांचें नातें व आचरणादिक भाव तशीच स्थिति **श्रीह्माळसापतींची** श्रीच्या ठायीं होती. व त्यांचें अनुभव श्रींचेसंबंधीं कोणी प्रेमळ भक्तांनीं **श्रीसाईलीलेंत** द्यावे. मला असें आठवत आहे कीं, कै. **काकासाहेबांनीं** त्यांचें कांहीं अनुभवांचे स्मरणार्थ टिपणवहींत केलेलें मी पाहिलेलें आहे. जेव्हां **श्रींची इच्छा** असेल तेव्हां त्याही लीला श्री जगापुढें आपोआप आणतीलच. तथापि कै. श्री भक्तराज **म्हाळसापती**

**बाबांचे** पुत्र रा. **मार्तंड भाऊ** यांना सविनय विनंती आहे कीं, त्यांनीं कांहीं अनुभव ( माहिती असतील ते. ) **श्रीसाईलीला संपादक** यांचेकडेस लिहून पाठवावेत.

श्रीचें, म्हाळसापतींचें व काकासाहेबांचें बोलणें वगैरे थोडें झालें. " उदी न्यावी " अशी आज्ञा झाली. त्याप्रमाणें आम्हीं उदी घेऊन परत वाड्यांत आलों. दुसरे दिवशीं सकाळींच श्री मशिदमाईंत मी गेलों. मागोमाग कांहीं भक्त मंडळींही आली त्यावेळेस श्री वस्तीशीं (भिक्षेसी) गेलेले नव्हते. श्रींचे हातास दुसरें एक मराठे ( कुणबी ) जातीचे गृहस्थ फडकें व कांदा बांधित होते मी वंदन वगैरे करून खालीं सभामंडपांत दूर उभा राहिलों. श्री पुढें जागेवरून उठून निंबराजवळ गेले तेथून धुनीपाशीं जाऊन कांहीं वाक्यें म्हणाले व म्हणतच बाजूचे खांबापाशीं कोळंबें व टमरेलें होतीं त्यापैकीं एका हातांत टमरेल घेऊन डाव्या खांद्यावर सुमारें पांच ते सात हात लांबीचें पांढरें स्वच्छ वस्त्र घेतलें व श्री मशिदीचें खालीं आले. ( भिक्षेशीं जाण्याची तयारी नेहमीं अशी असे. व टमरेलांत पाणीही पण नेहमीं असे.—टमरेलांत पाणी कां घेत होते, तर हिंदूधर्मांत चतुर्थाश्रमांत **संन्यासी** यांनीं भिक्षेस जातांना आपल्या कमंडलूंत-**गंगाजल** न्यावयाचें असतें. कारण भिक्षेंत आलेल्या अन्नावर प्रोक्षणादि करण्याचा नियम आहे. श्रींचेकडे जो ज्या धर्म-दृष्टीनें पाहील त्या त्या प्रमाणें ते दिसत होते. मशिदींतून चावडीपर्यंत बरीच मंडळी बरोबर होती. पण पुढें श्री एकटेच गेलेले दिसले. मीही परत वाड्यांत आलों. नंतर दोन सव्वा दोन तासांनीं श्रीसन्निध परत आलों यावेळेस श्रींची न्याहारी होऊन श्री कठड्यापाशीं बसलेले होते. व सभोंवार भक्तमंडळींचा समुदाय कांहीं बसलेले व कांहीं उभे असून श्रींचे मुखांतील अमृततुल्यवाणीचें सेवन बहुत औत्सुक्यानें करीत होता. मी गेलों. व श्रींच्या पदीं भाल ठेविलें व उजवे बाजूस कै. काकासाहेबांच्या मागें बसलों श्री कांहीं तरी गोष्ट सांगत होते. पण ती पूर्णपणें झालेली असावी असें वाटलें कारण श्रींची लेंडीवर जाण्याची तयारी होती. कारण श्री ज्या ज्या वेळेस

लेंडीवर जात असत त्या त्या वेळेस बरोबर जाणारा मराठे जातीचा इसम श्रींस म्हणाला, बाबा उठतां ना ? असें म्हटल्यावर सर्वत्र भक्तमंडळीस उदी घेण्याबद्दल सांगितलें. सर्वत्रांस उदी वगैरे देणें झाल्यावर श्री उठले. त्या वेळेस श्रींचें मशिदमाईंतील प्रत्येक जिन्नसाकडे पाहणें व धुनीपाशीं जाऊन श्री अग्निनारायणासन्निध महावाक्यादि त्यांची उच्चारण्याची क्रियादि ज्या ज्या मंडळींच्या दृष्टीस पडली ते ते नरनारी धन्यच होत. मला त्यावेळेस त्या दिवशीं व पुढेंहीं ( जेव्हां जेव्हां मी पाहीं, तेव्हां तेव्हां. ) असें वाटत होतें कीं, प्रभु श्रीकृष्णचंद्राभोंवतीं बालगोपालांचा थवा जसा असे (श्रीमत्भागवत स्कंध १० म. उत्तरार्ध व पूर्वार्ध पहावें. ) तसाच श्रीसाईश्यमातेच्या सभोंवतीं सतत असेच श्री लेंडीवर जाण्यास निघाल्याबरोबर मंडळींही बहुत होती. व ठायीं ठायीं भक्तादि मंडळींचें वंदनादिक क्रिया चालू होत्या रावबहादूर साठे यांच्या वाड्यापर्यंत मंडळीही बरीच होती. श्रीबरोबर सात आठ इसम गेले. श्रींची लेंडीवरील क्रियादि, ( ते तेथें काय करीत असत तें समजणें मजसारख्याच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. ) तास दीडतासांत आटोपल्यानंतर श्री मशिदमाईंत परत आले. सुमारें साडेअकराचे सुमारास मीहीं आलों. बहुतेक भक्तवृंद ह्यावेळेस आपआपल्या प्रेमीभक्तिप्रमाणें श्रीपदकमलांची पूजा, श्री कंठीं पुष्प-माळा, व नैवेद्यादि अर्पणविधि करीत असत. व कांहीं सभोंवार बसलेले तर कांहीं चरणाची सेवा करीत तर कांहीं श्रीमुखांतून निघणारीं वाक्यें एकाग्रतेनें ऐकून त्या वाक्याचा जो तो आपआपलेपरी अर्थ लावी. मध्यान्ह आरती व त्यावेळेची सेवा, व तेथील आनंदादि सोहळा वर्णन करणें कठीणच होय. मात्र त्यावेळेस सर्वांची भावना व लक्ष श्रींचें प्रसन्न मुखकमलाकडेसच वेधत असे हेंच खरें. मध्यान्ह आरती झाल्यावर श्री सर्वांस उदी घेण्याची आज्ञा देत व सर्व भक्तमंडळी पदकमलीं भाव ठेवून उदी घेऊन श्रीमशिदमाईंतून - सभामंडपीं येऊन श्रींचीं सगुणमूर्ति पहात असतां ती श्रीमूर्ति कशी दिसत असे तर,—घेवोनि उदि दूर राहुनि उभा जैं सद्गुरु पाहिला । तेव्हां जोडूनि श्रीहरी समपदें वाटे उभा राहिला ॥ ह्या

मानस पूजेंत वर्णिलेल्या वाक्याची सत्यताच स्पष्टपणें दिसे. उदी घेऊन वाड्यांत आल्यावर भोजनोत्तर पुन्हां मशीदमाईंत दोन अडीचच्या सुमारास गेलों. मी व आणखी सात आठ इसम श्रीचे चरणकमलापाशीं बसलों. माझें मनांत सकाळपासून 'संक्रांतीमहापर्वणी'बद्दल श्रीस विचारावें असें होतें. पण तसा वेळ कांहीं येईना. मात्र जेवणाच्या आधीं ( आरतीच्यानंतर ) उदी घेत असतां श्रीचें वाक्य पुढील प्रमाणें होतें. "आपल्या अल्ला मालकाच्या दरबारांत वाटेल तेव्हां लई चांगलं बोलावं अल्ला मालिक सर्वांचा आहे" एवढींच वाक्यें व ह्या वाक्यांचा मी आपले ठायीं विचार माझें पुरता असा केला कीं, आपणांस जें जें विचारणें तें तें सर्व विचारावें.दुसरीहि मंडळी त्या वेळेस होतीच व सदर वाक्यें कोणांस उद्देशून होतीं हें मात्र कवण जाणण्यास समर्थ होय ? बहुतेकांशीं **मालिक** अशीच भाषा करीत असत, तथापि निश्चयात्मकही ज्या त्या व्यक्तीस ( कधीं कधीं ) स्पष्ट इषाराही मिळत असे. मी श्रींना विचारलें कीं.'बाबा ही उद्यां महापर्वणीं 'तिलसंक्रांत' आहे. हिची माहति काय असावी. श्लोकार्थ--"रूढी मानुनि पाळितों, न कळुनी, हा पूर्वजांचा सण।ऐसे धार्मिक बंध पाळुनी अम्ही फेडीत कीं तदण ॥ पूर्वापाररूढी म्हणून, त्या समयाची श्रींची प्रसन्न मुद्रा व सर्वांशीं त्यांचीं प्रेमाची वागणूक व बोधामृताचें पान ज्या कोणास करण्यास मिळालें ते नर धन्यच होत. मंडळी स्थिर बसतात न बसतात तों श्रींनीं जात्याच्या बाजूस बसलेल्या इसमाकडे पाहून म्हटलें कीं " काय करावें, मालकाचं नांव घ्यावं, मी खूपच लांब पण मैदानच, लई मैदान, लई मोठ्या नद्या लागल्या, त्यांत दोन चार तर सर्वांना ठाव्या आहेतच.तसाच पुढें गेलों. अफाट मैदान, खूपच गर्दी, समद्याचें हातीं तलवारीन् बंदूका । कोणी मरतो. कोणाचंहातपाय, डोकें उडतें तर धूमधडाका, तसाच पुढें मी बी खेळलों. लई दमलों, मंग भोंवतालीं मंडळी फारच जमली, मी तर लांब लांब तरवारी जमिनीवर अंथरल्या. त्यांत आणखी लोखंडाचे खिळेबी जमिनींत उलटे ( हातांनीं खूण करून दाखविली, गाडले अन् त्यावर निजलों. त्यावेळस सूर्य उगवतकडून निघून राहात्याकडून निंमगांवाकडे जात होता, त्या सूर्याला

असे फिरायला सहा महिने लागतात, जेव्हां सूर्य उत्तर निमगांवचे बाजूला आला, तेव्हा आपण आपल्या घरीं गेलों असा लई मोठा दिवस बरं ? समद लोक जमतात, गोडगोड बोलतात बरं, अल्ला मालिकाशिवाय कोण मोठा आहे, अशी अल्ला मालिकाची करणी अन् अल्लामियाची माया, लई गमती बरं ? तिला तर हाकलल पाहिजच पाहिजे, मग आपला धरम कळतो, अन मोठा दिवस बी कळतो, सबुरी असावी बरं " इतक्यांत श्री. कै. भक्तराज म्हाळसापतीबाबा व माधवराव देशपांडे आले तेव्हां श्रींनीं आपले हातांतील चिलम मजपुढें करून " घे " मी ती वंदन करून, नजीक असलेल्या वृद्ध गृहस्थास दिली व मी जागेवरून उठून श्रीमालिकांच्या चरणावर भाल ठेऊन उठतों न उठतों तोच कै. काकासाहेबादि मंडळी आली. तो समय संध्याकाळचा. श्रीचे संध्याकाळीं फेरीचा असल्यानें श्री समोंवार भक्तवृंदांची मांदी बहूतच. सर्वांचें वंदनापि झाल्यावर श्रींनीं उदी घेण्यास सांगितलें. जो तो श्रीकरकमलांतून उदी घेऊन खालीं सभामंडपांत येऊं लागला. श्रींची संध्याकाळची सूर्यास्ताचें वेळची फेरी म्हणजे वर्णाश्रमधर्मप्रमाणें सायंकर्म होय--सायंसंध्याच होय--असें वाटलें. फेरी वगैरे आटोपल्यावर जो तो मालकांच्या गुणानुवादाच्या प्रेमानंदें लीला गातच आपापल्या स्थानाप्रत गेला. त्यादिवशीं रात्रौ सगुणमालिक मूर्तीचा शयनाचा चावडीचा तो सोहळा कांहीं औरच. त्याबद्दल काय लिहावें, कैसें वर्णन करावें, चावडींतील सगुणध्यान तें कैसें दिसत असे. उपमा कैसीं काय कवणें मुखें द्यावी तर ॥ श्लोकार्ध ॥ " तुझीच उपमा तुला बरवि शोभते सज्जना, समर्थगुरु साईनाथ पुरवी मनोवासना ॥" ह्या प्रभाताष्टकीं वर्णिलेली वाणीं सत्य होय. शेजारती आहे झाल्यावर वाड्यांत आलों. सकाळपासून उद्यां महापर्वणी संक्रांत, याबद्दल श्रीचरणीं विनंति, दुपारीं सांगितलेली ( श्रींनीं ) गोष्ट याचाच विचार, पण त्या गोष्टींचा खुलासा मनोमय होईना पुष्कळ विचार केला. तरीही वरील गोष्ट.--संक्रांतीबद्दलच--मी विचारलेल्यांचेंच उत्तर खास हेंच आहे असें वाटेना, कारण सदर गोष्टीचा आरंभ होतांना श्रींची दृष्टि दुसरेच इसमाकडे होती. असें हें मनन चाललें असतां रात्रही पुष्कळ झालेली पण स्वस्थता वाटेना. पुढे साधारण कुंभकर्ण-

सखीचें ( निद्रेचें ) पेंग येण्यास सुरवात झाला. त्या दिवशीं चावडींत श्रींचें काकड आरतीस जागरणामुळें माझें जाणें जाहलें नाहीं. दुसरें दिवशीं सकाळचा विधि आटोपल्यावर मशिदींत गेलों. श्रींची न्याहरी चालली होती व बराच भक्तसमुदायही नरनारीसह होताच. त्यांतून आजचा दिन तर "तिळगुळ घ्या आणि गोड बोला" असें ज्याच्या त्याच्या मुखांतून निघणारा हाच दिन. कित्येक भक्तांनीं श्रीकंठी घालण्यास शर्करावगुंठित, तिलाचें बहुविध रंगानीं अलंकृत केलेले दाण्यांचे हार (हलव्याचें) तर आपापलें परीनें तिळमिश्रित गुळांचें लाडू, तर शर्करामिश्रित तिल, श्रींचें सन्मुख ताटांत तर कोणीं वाटींत तर कोणी कागदाच्या पुडयांत ( संक्रांतीच्या वेळीं रंगीं बेरंगी कागदाचा केलेला पुडका. ) घेऊन उभेच होते. श्रींची न्याहरी आटोपली, कठड्यापाशीं श्रीस्वारी आली, व बसलीही, चिलम वगैरे ओढण्याची सुरवात होते न होते तों जो तों आपआपला तिळगुळ श्रीमल्किांचे सन्निध ठेवण्याचे करितच होता. तर कोणीं श्रीचे हातीं देत. व श्रीही थोडें घेत व कोणांशीं देत, अगर ज्याचें त्याशीं देत. अशी क्रिया सुरूच असतां, माझें विचार मात्र "संक्रांति" बद्दलचें स्पष्टीकरण अद्याप मिळालें नाहीं. व कां बरें मिळूं नये? अशा विचारांचेच काहुर सुरू झालें असल्यामुळें त्या वेळेस श्री मशीदमाईंतील लहानथोर बंधुभगिनीना श्रीकरकमलांतील प्रसादाचा लाभ जो होत होता त्यांकडेस माझें लक्ष नव्हतें. तथापि पुन्हां श्रीचरणीं मनोवासना कळवावी म्हणून श्रींचें सन्निध येऊन मोठा मनाचा हिय्या करून विचारलें कीं, बाबा? आजचा दिवस मोठा कां? मी शाम दीन आहे. दया असावी. इतकें म्हणून श्रीपदीं भाल ठेविलें. तों श्रींनीं तिळगुळाचे ( सदर हलवा श्रींचें करीं पूर्वीच त्यावेळेचें अधिकच कोणीं दिलेला होता व श्री त्या हलव्याकडे पहात व आपलेच डावे हातांतून उजवे हातांत, व उजवे हातांतून डावे हातांत घेण्याची क्रिया सुरूच होती. ) दाणे हातीं देऊन श्रींनीं बहुतच प्रेमें पुढील वाक्य उच्चारिलें " आपण मोठे आहोंत व ह्या तिळगुळाचे सार काका सांगेल त्याजपासून तिळगूळ घ्यावा व द्यावा. अल्ला मालिकाशिवाय मोठा कोण आहे मालिक सर्वांचें भलच करतो बरं,असच धर्म विचारतो व मी बी खिळ्याबर निजूनशान

( अपूर्ण )

# श्रीसाइशंकरायनमः

सा. न. वि. वि. खालील अनुभवास आपल्या श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं कृपेनें स्थळ मिळेल अशी आशा आहे.

कै. रा. रा. बापूसाहेब जोग हे बाबांच्या परमभक्तांपैकीं एक भक्त होते, हें बहुतेक साईभक्तांना विदितच आहे. बापू साहेबांचा कल पहिल्यापासून स्वधर्माचरणाकडे व साधुसंतांकडे असे. पेनशन घेण्याचे पूर्वीं त्यांनीं रजा घेऊन ते ठाणे जिल्ह्यांत भिवंडी तालुक्यांत श्रीक्षेत्रकवाड येथें श्रीसद्गुरु सखाराम महाराज यांच्या समाधिमंदिरासन्निध रहात असत. त्यांनीं मुरुडकर पाटणकरबुवांचा अनुग्रह घेतलेला होता. त्यांस संतती नव्हती. त्यांचें कुटुंब ( ज्यास आम्ही सर्वच " आई " म्हणत असूं ) फार सज्जन व पतिपरायण वृत्तीचें असे. बाबांचा महिमा ऐकून बापूसाहेब व सौ. आई हीं उभयतां शिरडीस बाबांचे दर्शनास आलीं. नंतर बाबांनीं त्यांना तेथेंच राहून घेतलें. तीं साठे साहेबांचे ( आतां नवलकर साहेबांचे ) वाडयांत मशिदीच्या बाजूकडील सोप्यांत रहात असें. बापूसाहेबांची वृत्ति चंचल, तडेतोड, तापट पण निष्कपटी अशी असे. आईंची वृत्ती फारच शांत व मनमिळाऊ. उभयतांचेंही बाबांवर अतिशय प्रेम. बापूसाहेबांचा स्वभाव सरळ पण तापट असल्यामुळें त्यांचा पुष्कळदां पुष्कळ भक्तांबरोबर खटका उडे. इतकेंच नव्हे पण कधीं कधीं ते बाबांशीं सुद्धां प्रेमानें भांडत व त्यांच्यावर रुसत. बाबा त्यांची समजूत करून त्यांस घरीं लाऊन देत.

बापूसाहेबांचा व माझे धाकटे बंधूंचा ( देव मामलेदार ) पुष्कळ वर्षांचा स्नेह असल्यामुळें आम्ही शिरडीस गेलों कीं त्यांचेच बिऱ्हाडीं उतरत असूं व तेही आम्हांस शिरडीस नेहमी येत जा व आमचेच बिऱ्हाडीं उतरत जा असें प्रेमानें सांगत. एकवेळीं मी एक महिनाभर त्यांचे बिऱ्हाडीं बाबांचीं सेवा बरेच दिवस करावी या हेतूनें एकटीच राहिलें होतें. त्यावेळचे व इतर वेळचे बापूसाहेबांनीं व सौ. आईनीं बाबांच्या संबंधानें मला सांगितलेले

अनुभव व मी पाहिलेला त्या उभयतांचा बोध घेण्यासारखा नित्याचा कार्यक्रम माझ्या आठवणीप्रमाणें मी येथें देण्याचें योजिलें आहे. बापूसाहेबांच्या पूर्वींच ३–४ वर्षें सौ. आई वारल्या. त्या शिरडींतच वारल्या. बाबांची पहाटेची काकड आरती व दुपारची आरती मेघा ( साठेसाहेबांचा ब्राह्मण ) वारल्यापासून रोज नेमानें बापूसाहेबच करीत. बाबांनीं बापूसाहेबांस श्री एकनाथी भागवत वाचण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणें ते एकनाथी भागवत नित्यनेमानें दुपारीं चार पांच वाजतां वाचीत. दुपारची आरती झाल्यावर बापूसाहेब बाबांस दररोज नैवेद्य घेऊन जात. सुरवातीला कित्येक दिवस नैवेद्य काय आणिला आहेस म्हणून बाबा त्यांना विचारीत. 'रोजचा साधाच नैवेद्य आणिला आहे' असें बापूसाहेब त्यांना सांगत. बाबा म्हणत 'शिरा करून नाहीं कां आणिलास ?' बापूसाहेब म्हणत 'नाहीं.' बाबा म्हणत 'तर मग जा करून आण.' बापूसाहेब म्हणत, 'बाबा तुम्हीं अगोदर सांगत नाहीं. आतां सांगतां. आतां बारा वाजून गेले. आतां शिरा इतक्यांत कसा तयार होणार.' बाबा म्हणत, 'बापूसाब आतां होईल. त्याला किती वेळ लागतो. जा करून आण जा.' बापूसाहेब म्हणत, 'बाबा आतां सर्वांनाच जेवणास उशीर होईल.' बाबा म्हणत 'कांहीं हरकत नाहीं. होऊं दे. पण शिरा करून आणच.' बापूसाहेब विचारीत 'शिरा किती करूं.' बाबा म्हणत 'आण शेराचा किंवा दोन २ शेराचा करून. बाबांच्या या आज्ञेप्रमाणें बापूसाहेब तितका शिरा करून आणीत. जरी सर्वांचे नैवेद्य आले असले तरी बाबा बापूसाहेबांचा शिरा येईपर्यंत थांबत. बापूसाहेबांची व सौ. आईंची कसोटी पाहाण्याकरतांच कीं काय कोण जाणें बाबा बहुतकरून दररोज याप्रमाणें शिरा करून आणण्यास सांगत. व तेही आळस किंवा अवज्ञा करीत नसत. याप्रमाणें क्रम सतत सुमारें २ वर्षें चालला. नंतर बाबांनींच एक दिवस बापूसाहेबांना सांगितलें कीं ' आतां शिरा पुष्कळ झाला. आणीत जाऊं नको.' सौ. आई ह्या नित्यनेमानें बाबांस सकाळची न्याहारी घेऊन जात. न्याहारीचे पदार्थ त्या फार आस्थेनें, प्रेमानें व भक्तीनें तयार करीत. कधीं दुधांतली बाजरीची दशमी, तर कधीं भाजणीचे थालपीठ, कधीं दुधांतली घिर्डी तर कधीं

दुधांतल्या थालिपिठाचे वडे याप्रमाणें पदार्थ करीत. आदमोऱ्या दह्याची वाटी व साजुक लोणकढी तुपाची वाटी मात्र दररोज असावयाचींच. एखादी सुंदर चटणी व एखादी बाबांच्या आवडीची भाजी ही रोज न्याहारीकरतां करीत. न्याहारीकरितां कधीं गव्हल्यांची खीर तर कधीं बेसनचा लाडूही करीत व बाबा कधीं लहर लागल्यास त्यापैकीं किंचित ग्रहण करीत. बापूसाहेब व सौ. आई या उभयतांस बाबांखेरीज अन्य विषय क्वचितच असे. सदा सर्व काळ बाबांचाच विषय, बाबांचाच ध्यास, बाबांच्याच गोष्टी चाललेल्या असावयाच्या. पहांटे काकड आरतीची तयारी करणें, सकाळीं न्याहारीची तयारी करणें, दुपारीं दुपारचे आरतीची, नैवेद्याची, जेवणाची व मधुकऱ्यांच्या मधुकरीची तयारी करणें, तिसरे प्रहरीं श्री एकनाथी भागवत वाचण्याकरतां तयारी करून देणें हीं कामें सौ. आईचीं असत. व तीच करण्यांत त्यांचा सर्व वेळ जाई. बापूसाहेब भागवत वरींच वाचीत. बापूसाहेबांकडे बाबांचें दर्शन घेण्यासाठीं आलेल्या भक्तमंडळीपैकीं रोज बहुतेक कोणीना कोणी तरी असेच. पण उभयतां दोघेंही पाहुणे भक्ताचा कंटाळा कधींच करीत नसत, उलट त्यांस प्रेमानेंच वागवीत. बापूसाहेबांस संतती नसल्याबद्दल त्या उभयतांनीं केव्हांही खिन्नता प्रगट केलेली नाहीं. तीं उभयतां मला आत्याबाई म्हणत. व मजवर फार प्रेम करीत व सदोदीत बाबांच्याच गोष्टी व अनुभव सांगत. बापूसाहेबांची व सौ. आईची बाबांवर अत्यंत निष्ठा. त्यामुळें कोणत्याही प्रकारचें संकट आलें, अडचण आली, किंवा शारीरिक व्याधी उत्पन्न झाली कीं तीं बाबांकडे धांव घेत व ते जसें सांगतील त्या प्रमाणें करीत. एकदा सौ. आईस कांहीं भयंकर रोग झाला होता. बाबांनीं त्यांस जवळ जवळ ६।७ महिने दुधावर राहाण्यास सांगून त्यांचा रोग बरा केला.

एके दिवशीं आई सकाळीं न्याहारी घेऊन गेल्या असतांना बाबा त्यांना म्हणाले, 'आई आज तुझ्याकडे एक म्हैस येईल. तिला पुष्कळ पुरणाच्या पोळ्या त्यावर पुष्कळ तूप घालून खावयास घाल.' आई म्हणाल्या 'बाबा मी पोळ्या तयार करीन व त्यावर तूपही पुष्कळ घालीन, पण ती म्हैस मी कुठें

शोधावयास जाऊं व ती अमकीच म्हैस असें मी कशावरून ओळखूं.' बाबा म्हणाले 'आई तुला ती काळजी कशाला पाहिजे. तुझ्या पोळ्या तयार झाल्या कीं ती म्हैस तुझ्या दाराशींच येईल.' आई म्हणाल्या, 'मी ज्या वाड्यांत राहातें त्या वाड्यास दारें दोन आहेत. व पुष्कळवेळां दोन्ही दारांशीं म्हशी येतात. व त्या वाटेल तेव्हां येतात. तेव्हां आपण म्हणतां तीच म्हैस ती असें मी कशावरून समजूं ?' बाबा म्हणाले 'तुझ्या पोळ्या तूप लावून तयार झाल्या कीं ज्या दाराशीं जी म्हैस येईल तीच ती म्हैस. ती मागील दाराशींच येईल.' बाबांच्या आज्ञेनुरूप आईंनीं आस्थापूर्वक सुंदर पुरणाच्या पोळ्या तयार केल्या व त्यावर यत्किंचितही कसर न करतां यथास्थित तूप घालून त्या चांगल्या चुबचुबीत केल्या. सुमारें १२ १२॥ चा सुमार झाला. आई मागील दारीं जाऊन पाहातात तों खरोखरीच एक म्हैस दाराशीं नजरेस पडली. त्यांना परमानंद झाला व बाबांच्या बोलण्याचें साश्चर्य कौतुकही वाटलें. त्यांनीं लागलीच त्या पोळ्या तिच्यापुढें आणून ठेविल्या, त्या म्हशीनें त्या सर्व पोळ्या खाल्या व लागलीच तेथल्या तेथेंच प्राण सोडला. आई घाबरल्या. त्यांचा सर्व आनंद मावळला. त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें. त्या अतीशय हळहळूं लागल्या. त्यांना ह्यांतील इंगित कांहींच कळेना. त्यांना वाटूं लागलें कीं आपल्या हातून ही निष्कारण मोठी हत्याच झाली. पोळ्यांतील कणीक, पिठी, पुरणांतील गूळ, डाळ व तूप हे सर्व पदार्थ नीट पाहून घेतलेले होते. व आपणही पोळ्या मनोभावानें केल्या होत्या. मग हें असें कसें झालें. म्हैस कां मेली. याचें पातक कोणाचे माथ्यावर. मी तर अगदीं निरपराधी आहें. मी जें केलें तें स्वतःचे मतानें केलें नाहीं. बाबांच्या आज्ञेनें केलें. असें असतां हें अरिष्ट मजवर कां कोसळावें. आतां मला लोक काय म्हणतील.ती म्हैस कोणाची ? तिचे मालकास ही गोष्ट कळली म्हणजे तो म्हणेल कीं या बाईनें माझी म्हैस मारली. बाबांच्या आज्ञेवरून मी हें केलें हें त्याला काय माहीत ? तो मला दोष देणारच. त्यानें म्हशीची किंमत मागितल्यास किंवा सरकारदरबार केल्यास त्याचा परिणाम

काय होईल ? या व अशाच अनंत सुष्ट व दुष्ट कल्पनांनीं व विचारतरंगांनीं त्यांचे मनांत रण माजविलें. विश्वरंगभूमीवरील नटाचार्य प्रभु बाबांची अघटित करणी कोणास कळणार ? त्यांच्या आज्ञेनें केलेल्या गोष्टींचा परिणाम विपरीत झाला म्हणून त्या अपयशाचें खापर ते आपल्या भक्तांच्या माथ्यावर कधीं तरी फोडतील काय ? बाबांचा यांत काय हेतू होता तो आतां आपण त्यांसच विचारावा असें मनांत आणून आई तशाच बाबांच्याकडे धांवल्या. व झालेली सर्व हकीकत त्यांनीं बाबांच्या चरणीं निवेदन केली. बाबा म्हणाले ' आई भिऊं नकोस. झालें त्यांत वावगें कांहींच झालें नाहीं. तें असेंच व्हावयाचें होतें. अग त्या म्हशीची तेवढीच वासना राहिली होती. व ती तिची तृप्त झाल्याबरोबर ती त्या योनींतून सुटली. आतां तिला चांगला जन्म येणार आहे. जा तूं आपले घरीं. तुला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. उगीच खेद करूं नको. तूं तिला म्हशीच्या योनींतून सोडवलीस यांत तिचें तूं वाईट काय केलेंस ? ' याप्रमाणें बाबांच्या मुखांतील बोल श्रवण केल्यावर आई आनंदानें घरीं आल्या. काय ही सर्वज्ञता !

एकवेळीं असें झालें कीं बापूसाहेबांच्या वडिलांची श्राद्धतिथि आली. बापूसाहेब कोंकणस्थ. शिरडी गांवांत सर्व ब्राह्मण माध्यंदिन शाखेचे. बापूसाहेबांना नेहमींच श्राद्धपक्षाकरतां कोपरगांवाहून त्यांच्या शाखेचे ब्राह्मण आणावे लागत. पहांटेची काकड आरती, दुपारची पूजा व आरती व चावडीचे दिवशीं रात्रीची पूजा व आरती हीं नित्याचीं कामें बापूसाहेबांकडे असत. तेव्हां त्यांना केव्हांही व कोणत्याही कामाकरतां शिरडी सोडून जातां येत नसे. व जावेंच लागलें तर ते बाबांची आज्ञा घेऊन जात. वडलांची श्राद्धतिथि जवळ आली. मी कोपरगांव किंवा दुसऱ्या इतर गांवीं जाऊन ब्राह्मणांची सोय पाहातों. व त्यांना आमंत्रणें देऊन येतों. करतां मला एक दिवस बाहेरगांवीं जाण्याची आपण परवानगी द्या असें बापूसाहेब बाबांना म्हणाले. बाबा म्हणाले, ' बापूसाब अजून श्राद्धास किती दिवसांचा अवकाश आहे व तूं किती ब्राह्मण सांगतोस ? बापूसाहेब म्हणाले बाबा अजून ८ दिवसांचा

अवकाश आहे. व मी प्रतिवर्षी दोनच ब्राह्मण सांगतों. बाबा म्हणाले बरें आहे. उद्यां पाहूं. बापूसाहेबांनीं एकदोन दिवसांनीं पुन्हां ती गोष्ट बाबांच्याकडे काढिली व पुनः परवानगी मागितली. त्याही वेळीं बाबा म्हणाले, 'पाहूं आणखी एक दोन दिवसांनीं.' बापूसाहेबांनीं आणखी एक दोन दिवस वाट पाहिली. व पुन्हां बाबांना परवानगी विचारली. बाबा म्हणाले ' असूं दे पाहूं पुढें. ' बापूसाहेब तापट व चंचल मनाचे. ते म्हणालें, बाबा मी आतां वाट किती दिवस पाहूं. आपण मला सोडीत नाहीं. मग श्राद्ध करूं नको कीं काय?' बाबा म्हणाले ' बापूसाब अजून श्राद्धास चार दिवसांचा अवकाश आहे. त्या करतां आजपासून ब्राह्मण पाहून ठेवून काय करावयाचें आहे. पाहातां येईल पुढें.' दोन तीन दिवसांनीं बाबांचें हें बोलणें बापूसाहेबांस पटेना. व बाबा असें कां सांगतात तेंही कळेना. बाबांवर श्रद्धा तर पूर्ण. पण बाबा हें असें काय करतात. जाण्याला परवानगी कां देत नाहींत. श्राद्ध करूं नकोस असेंही सांगत नाहींत. व जाऊंही देत नाहींत. परक्या गांवाहून ब्राह्मण आणावयाचे. त्यांना अगोदर पासून आमंत्रण न दिल्यास ते आयते वेळीं कसे येतील? त्यांनीं दुसरीकडे आमंत्रणें घेतलीं किंवा त्यांना इतर कांहीं अडचणी आल्या तर काय करणार? असे अनंत तरंग बापूसाहेबांचे मनांत येऊं लागले. श्राद्ध जवळ आलें, अजून ब्राह्मणांस आमंत्रणें दिलीं नाहींत. घरांत श्राद्धाची कांहीं तयारी केलेली नाहीं. तरी या वर्षी मामंजींचें श्राद्ध करावयाचें आहे कीं नाहीं वगैरे प्रश्न आईही बापूसाहेबांस विचारूं लागल्या. झालेली सर्व हकीकत बापूसाहेबांनीं कुटुंबास सांगितली. त्यांनाही हें कोडें उकलेना. त्याही म्हणूं लागल्या कीं, परवांवर श्राद्ध आलें आज किंवा उद्यां तरी पुनः एकवार बाबांना विचारावें व कोपरगांवास जाऊन यावें. बापूसाहेब म्हणाले बरें पुनःएकवार उद्यां विचारतों. तुमची घरांत श्राद्धाची तयारी मात्र असूं द्या. खरेंच निमिषार्धांत अनंत कोटी ब्रह्मांडे निर्माण करणाऱ्या साई परमात्म्यास बापूसाहेबांच्या वडिलांच्या श्राद्धाकरितां लागणाऱ्या दोन ब्राह्मणांची काळजी कसली? कोणाही ब्राह्मणाच्या मनांत

प्रेरणा करण्यास त्यांना काय अशक्य? परंतु संतसंगती कितीही झाली तरी त्यांच्या सर्वसत्ताधारित्वाबद्दल एकदम खात्री पटावी कशी? किती झालें तरी आपण अज्ञानी जीव. त्यांच्या दिव्य ज्ञानापुढें आपली बुद्धिमत्ता ती किती? असो. बापूसाहेबांनीं आधले दिवशीं पुनः एकवार विनंती केली व बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले, 'आपल्याला कोठें जायला नको. ब्राह्मणच उद्यां येथें येतील. बापूसाहेब म्हणाले ' बाबा हें काय? माझ्या घरीं श्राद्ध आहे असें त्यांना स्वप्न का पडणार आहे? शिवाय उद्यां ब्राह्मण आले व ते माझ्या शाखेचे नसले म्हणजे आयत्या वेळेस माझ्या शाखेचे ब्राह्मण कोठून आणूं?' बाबा म्हणाले ' तुला जसे पाहिजे तसेच मिळतील. बापूसाहेबांस तें खरेंच वाटेना. ते म्हणत बाबा येथें उत्सव नाहीं, पर्वणी नाहीं विशिष्ट तिथीहा नाहीं. असें असतां माझे शाखेचे ब्राह्मण कोण येणार? बाबा म्हणाले ' जा येतील कोणी तरी,' बापूसाहेब निरुत्तर झाले. त्यांनीं हें सर्व वर्तमान कुटुंबाला सांगितलें. त्या म्हणाल्या, बरें आहे बाबांची मर्जी आपण आपली श्राद्धाची तयारी करून ठेऊं म्हणजे झालें. खरोखरच परब्रह्माच्या मुखांतून निघालेलीं अक्षरें असत्य कशीं होतील? एका कविवर्यानें म्हटलेलें मला आठवतें.

**लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुधावति ।**
**ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ।।**

लौकिकी साधूंच्या मुखांतून जे शब्द निघतात ते पुढें होणाऱ्या गोष्टीचा रागरंग पाहून निघत असतात. परंतु संतवर्यांच्या मुखांतून जे शब्द निघतात ते सत्य करण्यासाठीं त्यांच्या मागें अर्थ धांवत असतो. असो. मला संस्कृत येत नाहीं. पण पाठांत असलेला श्लोक व स्मरणांत असलेला अर्थ वर दिला आहे. खरें खोटें वाचक पाहून घेतील.

मौजेची गोष्ट ही कीं खरोखरच दुसरे दिवशीं सकाळीं पुणतांब्याचे दोन उत्तम विद्वान श्राद्ध चालविणारे कोंकणस्थ ब्राह्मण बाबांचे दर्शनास आले. त्यांनीं बाबांचे चरण वंदन करून बाबांनाच विचारलें, 'महाराज येथें

भोजनाची सोय कोठें होईल ?' बाबा म्हणाले, 'जा त्या बापूसाहेबाच्या घरीं ब्राह्मण शोध करीत बापूसाहेबांच्या बिन्हाडीं आले व विचारूं लागले की बाबांनीं आम्हांस आज आपलेकडे भोजनास यावयास सांगितलें आहे. आम्ही पुणतांब्याचे कोंकणस्थ ब्राह्मण. आम्ही आतांच त्यांचें दर्शन घेऊन आलों. बापूसाहेबांस व आईस परमाश्चर्य वाटलें व परमानंद झाला. ते म्हणाले 'पण तुम्हांस श्राद्ध चालवतां येतें काय ?' ब्राह्मण म्हणाले 'होय. आमची भिक्षुक व याज्ञिकीवृत्तीच आहे.' अहाहा कोणा सद्भक्ताला अशा गुरुमाउलीच्या सर्वज्ञतेबद्दल साभिमान कौतुक वाटणार नाहीं ! बापूसाहेब व आई यांना श्राद्ध व्हावें ही उत्कट इच्छा. मग गुरुराय त्यांच्या सदिच्छेच्या आड कसे येतील. कोपरगांवास जाऊन ब्राह्मण शोधून आणण्याचा खर्च व खटपट वाचवून आपल्या मनाजोगें आपल्या शाखेचे विद्वान ब्राह्मण श्राद्ध तिथीचे दिवशीं आपल्या घरीं आणून देण्याची तजवीज करणारे सद्गुरु कोठें मिळणार ! ज्यांना बाबांच्या निकट सान्निध्यांत बहुतकाल राहून त्यांच्या वर प्रमाणें असंख्य लीलानुभवाचा प्रतिदिनीं आस्वाद चाखावयास मिळाला ते बापूसाहेब धन्य व त्यांचें पतिपरायण कुटुंब आई त्याही धन्य.

बापुसाहेबांना १०० रुपये पेन्शन मिळत असे व प्रथम प्रथम ते दरमहा ५० रु. बाबांना देत व बाकीचे आपल्या खर्चासाठीं ठेवीत. पुढें पुढें महिन्याचीं बिलें चुकवून जी शिल्लक राहील ती सर्व ते बाबांना देत असत. जरी त्यांना मूलबाळ नव्हतें तरी, दररोजचा शेर दोन शेराचा शिरा, चारपांच मधुकरी पाहुणे व वारकरी असल्यामुळें त्यांच्या खर्चाची नेहमींच ओढाताण होत असे. त्यामुळें त्यांस लोकांचें थोडें फार देणेंही होई. व केव्हां ते घरांतील चीजवस्त गहाण ठेवूनही नित्याच्या खर्चाकरितां पैसे काढीत. परंतु कुटुंबाखेरीज त्यांचे मागें मुलाबाळांचा अगर आप्तइष्टांचा कांहीं व्याप नसल्यामुळें प्रपंचाबद्दल त्यांस फारशी फिकीर वाटत नसे. बाबा त्यांचे जवळ फार करून कधीं दक्षणाही मागत नसत. व कदाचित मागितलीच तर बापूसाहेब त्यांच्या नेहमींच्या तापट स्वभावाप्रमाणें सडेतोड उत्तर देत कीं, 'बाबा आपल्यास माहीत आहे कीं मजजवळ दिडकी नाहीं. मग आपण

दक्षणा कसली मागतां व ती मी देऊं कोठून ?' बाबा शांतपणानें म्हणत 'अरे बापूसाब दक्षणा देऊं नका. पण रागावतां कां ?' याप्रमाणें उभयतांची भाषा होऊन बापूसाहेब परत जात.

बापूसाहेब नोकरीवर असतांना त्यांनीं एका गृहस्थास १४०० रुपये व्याजीं दिले त्यास १२-१४ वर्षें झाली. सौ. आईचा व त्या गृहस्थाचा त्यांच्या माहेरकडून कांहीं नात्याचा संबंध होता. तो गृहस्थ त्यावेळीं फार अडचणींत होता व बापूसाहेबांसही त्यावेळीं पैसे देण्याची सवड होती. म्हणून आईचे आग्रहावरून बापूसाहेबांनीं त्यांस रक्कम दिली. तो गृहस्थ औरंगाबादकडचा राहाणारा. त्याची परिस्थिती बिघडल्यामुळें त्याचेकडून कित्येक वर्षांत दिडकी वसूल येईना. मागणीं फक्त पत्रोपत्रीं करावयाची. दोन चार वेळां बापूसाहेब त्याच्याकडे जाऊन आले. परंतु त्यांच्या जाण्याचा कांहीं एक उपयोग न होतां त्यांना हात हलवीत परत यावें लागलें व जाण्या येण्याचा खर्च मात्र अंगावर पडला. पण त्यावेळीं ते नोकरीवर होते व २०० रु. त्यांस पगार मिळत असे. त्यामुळें या खर्चाचें त्यांस विशेष वाटत नसे. परंतु बाबांचे जवळ राहिल्या पासून थोड्या पैशांत प्रपंच भागविण्याची पाळी आल्यापासून त्यांना त्या गृहस्थाकडे जाण्यास दोन अडचणी येऊं लागल्या. एक खर्चाची व दुसरी बाबांच्या परवानगीची. खर्चाच्या अडचणीपेक्षां बाबांच्या परवानगीचीच त्यांना जास्त अडचण भासे. केव्हां ही परवानगी विचारावयास गेले म्हणजे बाबा म्हणत, 'आतांच जावयाचें काय अडलें आहे ? पाहायला येईल मग याचा विचार. वेळोवेळीं खर्चाची अडचण झाली कीं बापूसाहेब बाबांकडे औरंगाबादेकडे जाण्याची परवानगी विचारीत व बाबा त्यांना वरप्रमाणेंच जबाब देत. असें कित्येक वर्षें चाललें. बापूसाहेब विचारून विचारून कंटाळले. बाबा परवानगी देत नाहींत असें पाहून कित्येक वेळां बापूसाहेब एकेरीवरही येत व म्हणत कीं 'बाबा आपण परवानगी देत नाहीं तर मी आपले २-३ हजार रुपये बुडवूं कीं काय ? संभाळा आपली पूजा व आरती. उद्यांपासून मी ती करणार नाहीं व तसाच निघून चालता होईन

पैशांवाचून मी येथें काय करूं ?' बाबा म्हणत 'अरे आपले पैसे कोठें जातात ? ते घरबसल्या येतील. तूं इतकी उतावळ कां करतोस ?' बापूसाहेब लागलीच डोक्यांत राख घालीत व म्हणत कीं, 'बाबा मी आपलें ऐकणार नाहीं. तो गृहस्थ येथें कसला येतो ? मी स्वतः त्याचेकडे २–४ वेळां खर्च करून गेलों तरी तो कवडी देत नाहीं. त्याच्यावर फिर्याद लावल्यावांचून तो पैसे देणार नाहीं. करतां मला जाऊं द्या. 'बाबा म्हणत 'बरें सध्यां राहूं द्या. पुढें पाहूं. ह्याप्रमाणें बाबा बोलले म्हणजे बापूसाहेब निराश होऊन बिऱ्हाडीं परत जात. तथापि कितीही निराशा झाली तरी बाबांवर उभयतांची ही निष्ठा अढळ यांत मात्र बिलकूल शंका नाहीं. मनुष्यस्वभावच असा आहे कीं त्याची कोणाही विभूतीवर कितीही श्रद्धा असली तरी श्रद्धा फलद्रूप होण्यास जी विलक्षण सबूरी लागते ती त्याचे ठिकाणीं फारच अल्प असते. त्यामुळें संतवाक्याबद्दल याची वृत्ती कांहीं वेळ साशंक होते. बाबांची तरी मजा अशीच असे. तेहीः फार वेळ भक्तांची सबूरी चांगलीच कसोटीस लावीत. व त्यामुळें भक्तांचे मुखावर साहजिकच निराशेची छटा झळके. असो. बाबा आपल्याला जाण्यास परवानगी देत नाहींत असें पाहून बापूसाहेब दिवसेंदिवस या पैशाबद्दल जास्त जास्तच निराश होऊन त्यांनीं जवळ जवळ तो नाद सोडूनही दिला. व आतां या बाबतींत पुनः विचारावयाचें नाहीं असें त्यानीं मनांत ठरवून ते स्वस्थ बसले. परंतु चमत्कार हा कीं, गतप्राण झालेल्या शरीरांत जसें एकदम चैतन्य येऊन त्यानें उठून बसावें त्याचप्रमाणें तिलांजली सोडलेल्या पैशाचें कूळ लवकरच पुढें एके दिवशीं २–३ मंडळीसह शिरडीस बापूसाहेबांचे बिऱ्हाडीं आलें. त्यांना पाहून बाबांच्या अघटित घटनेबद्दल साश्चर्य कौतुक तर वाटलें; परंतु त्यांची बाबांवरची श्रद्धाही अतिशय दुणावली; औरंगाबादेचें देणेदार कूळ आम्हीं सावकार येथें असतां केवळ बाबांच्या दर्शनाकरतां खात्रीनेंच आलें नाहीं. पण त्याच्या येण्यानें कांहीं लभ्यांश होतो कीं नाहीं या विचारांत बापूसाहेब पडले. आपण १२–१४ वर्षांत बापूसाहेबांस व्याजाची किंवा मुदलाची एक दिडकीही दिली नाहीं तेव्हां बापूसाहेब